महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक: १२ जानेवारी, २०२२.

क्रमांक: ६०५ /क-१, या सचिवालयातील श्री.निलेश वडनेरकर, उप ग्रंथपाल (संदर्भ व संशोधन) यांची ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी या पदावर पदोन्नती झाल्यामुळे रिक्त झालेल्या उप ग्रंथपाल (संदर्भ व संशोधन) (एस-२० : ५६१००-१७७५००) या पदावर श्री.त्रिभुवनदास बा.पाटील, तांत्रिक सहायक यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून त्यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे.

३. श्री.त्रि.बा.पाटील, तांत्रिक सहायक यांना **"उप ग्रंथपाल (संदर्भ व संशोधन)"** पदावरील तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे :-

(अ) सदरची पदोन्नती अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात आली आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे श्री.त्रि.बा.पाटील यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

४. उप ग्रंथपाल (संदर्भ व संशोधन) संवर्गातील सदर पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधीन राहून करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुभाष नलावडे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..२/-

\\MLS-DATASERVER\C Branch\1401\C-101\Local Disk (d)\E Drive\2021\promotion\Dy Librarian\order.doc

प्रति,

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई-४०० ००४ यांना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुढील प्रकाशनात भाग-१, अधिसूचना, याखाली प्रकाशित करण्यासाठी अग्रेषित. प्रकाशित अधिसूचनेच्या २० प्रती सचिवालयाकडे कृपया पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

प्रतिलिपी :-

१) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

३) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

४) या सचिवालयातील सर्व अधिकारी.

५) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

६) श्री.त्रि.बा.पाटील, तांत्रिक सहायक

७) क-२ (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) वैयक्तिक नस्ती.

९) निवडनस्ती.